## महाविद्यालयाचे शिस्त विषयक नियम :

१) प्रथम वर्ष वर्गामध्ये महाविद्यालयात १ जून पासून १० जून पर्यंत प्रवेश घेता येईल. प्रवेश अर्ज, स्कॉलरशिपचे अर्ज व परीक्षा फॉर्म ऑनलाईन पद्धतीने महाविद्यालयात भरावा.

२) प्रवेश दिल्याबरोबर नियमाप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला फी भरावी लागेल. फी भरल्याशिवाय प्रवेश निश्चित होणार नाही.

३) महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याने ओळखपत्र आपल्या गळ्यात घातले पाहिजे आणि कॉलेज अधिकारी/शिक्षकांनी मागितल्यावर दाखविले पाहिजे.

४) प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या विषयाच्या तासांना/स्वाध्यायांना व चर्चासत्रांच्या तासांना नियमितपणे वक्तशीर उपस्थित राहिले पाहिजे.

५) शिस्तीच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी आपापल्या वर्गात बसावयाचे आहे. अन्य वर्गात बसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विद्यार्थ्यावर योग्य ती कारवाई केली जाईल.

६) वर्ग चालू असताना विद्यार्थ्याने आपल्या वर्तनाने इतरांना कुठल्याही प्रकारचा उपद्रव होणार नाही, याची खबरदारी घ्यावी.

७) वर्ग चुकवून व्हरांड्यात व इतरत्र फिरणाऱ्या विद्यार्थ्यांना शिस्त व समितीच्या नियमाप्रमाणे शासन केले जाईल. External B.A./B.Com./B.Sc. ची सोय महाविद्यालयात नाही.

८) महाविद्यालयाच्या परीक्षेत बसून उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के गुण मिळवले पाहिजेत. परीक्षेला न बसणाऱ्या विद्यार्थ्यावर परीक्षा समितीने मान्य केलेल्या नियमानुसार कारवाई केली जाईल.

९) विद्यार्थ्याने प्रत्येक सत्रात कमीत कमी ७५ टक्के दिवस हजर राहिले पाहिजे. वारंवार गैरहजर राहणारे किंवा समाधानकारक प्रगती न दाखवणाऱ्या विद्यार्थ्यांना कॉलेज/विद्यापीठ परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

१०) महाविद्यालयामध्ये कोणतेही मंडळ सुरू करणे, सभा घेणे, सभेचा पाहुणा बोलविणे या गोष्टी कॉलेजच्या हिताच्या दृष्टीने प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाहीत.

११) महाविद्यालयातील वक्तृत्व स्पर्धा किंवा समारंभामध्ये चर्चिल्या जाणाऱ्या विषयांना तसेच नियोजित अध्यक्षांना प्राचार्यांची संमती घेतली पाहिजे.

१२) कोणत्याही विद्यार्थ्याला सहल अगर अन्य कारणांसाठी प्राचार्यांच्या पूर्व मंजुरीशिवाय वर्गणी गोळा करता येणार नाही. सहलीमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना पालकांची संमतीपत्रके आणावी लागतील. त्याशिवाय विद्यार्थ्यांना सहलीमध्ये सहभागी होता येणार नाही.

१३) कॉलेजचे कामकाज, शिस्त व प्रतिष्ठा यांना बाधा येईल असे वर्तन कोणत्याही विद्यार्थ्याने कॉलेज व कॉलेज बाहेर केल्याचे आढळल्यास त्याच्यावर कारवाई केली जाईल.

१४) कॉलेजच्या आवारात, वर्गात, ग्रंथालयात व समारंभाच्या वेळी शांतता राखण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने खबरदारी घ्यावी. तसेच कॉलेजमध्ये धुम्रपान करणेस सक्त मनाई आहे.



Scanned with CamScanner

१५) प्राचार्य, प्राध्यापक व कॉलेज कर्मचारी यांनी शिस्तीसंबंधी दिलेल्या तोंडी अथवा लेखी सूचना विद्यार्थ्यांनी पाळाव्यात.

१६) कॉलेजशी व संस्थेशी संबंधित असलेली कोणतीही माहिती अथवा वृत्त प्राचार्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय वृत्तपत्रांमध्ये वा अन्यत्र प्रसिद्धीसाठी परस्पर देता येणार नाही.

१७) महाविद्यालयाच्या मालमत्तेची योग्य काळजी घेणे प्रत्येक विद्यार्थ्याचे कर्तव्य आहे. त्या मालमत्तेची कोणतीही मोडतोड, नासूधस केलेली आढळल्यास संबंधित विद्यार्थ्यांकडून नुकसानभरपाई भरून घेतली जाईल. शिवाय शिस्त समितीच्या नियमाप्रमाणे कारवाई केली जाईल.

१८) एखाद्या विद्यार्थ्याचे महाविद्यालयातील अस्तित्व कॉलेजच्या हिताच्या व शिस्तीच्या दृष्टीने हानीकारक वाटल्यास (उद्धट भाषा, गैरवर्तन किंवा आज्ञाभंग इत्यादी) अशा विद्यार्थ्याला कोणतेही कारण न दाखविता काढून टाकण्यात येईल.

१९) विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या पत्त्यावर आलेले टपाल खुल्या सूचना फलकावर लावले जाईल. संबंधित विद्यार्थ्यास त्याचे टपाल न मिळाल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयावर राहणार नाही.

२०) वरील नियमात बदल करण्याचा व अंतिम निर्णय देण्याचा संपूर्ण अधिकार प्राचार्यांना आहे. शिस्तीच्या दृष्टीने प्राचार्यांचा निर्णय बंधनकारक राहील.

२१) विद्यार्थ्यास महाविद्यालयाच्या कार्यालयाकडून आवश्यक असलेले कागदपत्र, दाखले इत्यादी मिळणेसाठी मागणी अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.

२२) या कॉलेजचे विद्यार्थी नसलेल्या कोणत्यही व्यक्तीस परवानगीशिवाय महाविद्यालयाच्या आवारात अगर इमारतीत परस्पर प्रवेश घेता येणार नाही. महाविद्यालयात प्रवेश मिळालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाचा नावलौकिक सतत वाढवत ठेवण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहिले पाहिजे. महाविद्यालयात व बाहेर अशा दोन्ही ठिकाणचे त्यांचे आचार व विचार महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेला शोभून दिसतील याची दक्षता त्याने घेतली पाहिजे. बेशिस्त व गैरवर्तणूक होणार नाही अशी मनोमन प्रतिज्ञा प्रत्येक विद्यार्थ्याने केली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थी महाविद्यालयाच्या कुटुंबाचा एक घटक आहे या भावनेने त्याचे सर्व व्यवहार झाले पाहिजे. विद्यार्थ्याने आपल्या अडीअडणी, तक्रारी अगर सूचना प्राचार्य अगर प्राध्यापकवर्ग यांचेकडे मोकळेपणाने मांडाव्यात. महाविद्यालयातील विद्यार्थ्याचे जीवन सुंदर व सुखकर होण्यासाठी जे करणे आवश्यक आहे ते महाविद्यालय करीत राहील. त्यात विद्यार्थ्याचाही सहभाग असला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या यशातच महाविद्यालयाचे यश आहे अशी संस्थेची भावना आहे.

महाविद्यालयाच्या आवारात मोबाईल वापरणेस सक्त मनाई आहे.
(विद्यापीठ परिपत्रक नं. No./UG/552, दि. ३१ नोव्हें. २००४)



Scanned with CamScanner